मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा! : ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी–चिंचवड » बुधवार, दि. 15 मे 2024 | पान- 1

# लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस 'निष्प्रभ'

## पिंपरी, चिंचवड आणि भोसरीतही प्रभाव दाखवता आला नाही : स्थानिक दिग्गजांची राजकीय 'स्पेस' भरुन काढण्याची संधी हुकली

**पिंपरी | प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने पिंपरी-चिंचवड शहरात 'प्रभाव' दाखवण्याची संधी असतानाही दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या स्थानिक नेते 'निष्प्रभ' दिसले. त्यामुळे आगामी काळात शहरात राष्ट्रवादीला अस्तित्व टिकवण्यासाठी संघर्ष करावा लागणार आहे.

"उद्योगनगरी पिंपरी-चिंचवड" हा एकेकाळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा 'बालेकिल्ला' म्हणून ओळखला जात होता. अजित पवार यांच्या राजकारणातील एन्ट्रीने या बालेकिल्ल्यात राष्ट्रवादीने निर्विवाद सत्ता स्थापन केली. राष्ट्रवादीच्या स्थापनेपासून २०१७ पर्यंत पिंपरी-चिंचवड महापालिका राष्ट्रवादीच्या ताब्यात होती.




मधल्या काळात दिवंगत लक्ष्मण जगताप आणि महेश लांडगे यांनी राष्ट्रवादीतून भाजपामध्ये प्रवेश केला. २०१४ मध्ये जगताप यांनी चिंचवडमध्ये 'कमळ' फुलवले. पिंपरीतून ॲड. गौतम चाबुकस्वार यांनी 'धनुष्यबाण' चिन्हावर विजय मिळवला आणि राष्ट्रवादीच्या अण्णा बनसोडे यांना पराभव दाखवला. भोसरीतून महेश लांडगे यांनी माजी आमदार विलास लांडे यांना पराभूत केले. २०१७ मध्ये जगताप आणि लांडगे जोडीने महापालिकेवर वर्चस्व मिळवले. २०१९ मध्ये पिंपरी विधानसभेत अण्णा बनसोडे यांच्या रुपाने राष्ट्रवादीला अस्तित्व टिकवता आले. त्यामुळे राष्ट्रवादी पुन्हा उभारी घेईल, अशी अपेक्षा होती.

दरम्यान, राज्यात महाविकास आघाडीचा प्रयोग झाला. त्यावेळी संधी असतानाही पिंपरी-चिंचवडमध्ये राष्ट्रवादीला बस्तान बसवता आले नाही. भाजपातून दोन-तीन पक्षप्रवेश वगळता राष्ट्रवादीची कामगिरी सुमार राहिली. राज्यात शिंदे गटाने शिवसेना फोडली आणि महायुतीचे सरकार स्थापन झाले. त्यानंतर भाजपा पुन्हा सत्तेत विराजमान झाले. त्यामुळे पिंपरी-चिंचवडच्या राष्ट्रवादीला पुन्हा ग्रहण लागले.

राष्ट्रवादीतून बाहेर पडत अजित पवार यांनी 'महायुती'मध्ये सहभागी भूमिका घेतली. त्यामुळे राष्ट्रवादी उभी फूट पडली. शरद पवार यांच्या राष्ट्रवादीला स्थानिक नेतृत्त्वच मिळणार नाही, अशी स्थिती निर्माण झाली होती. मात्र, भाजपाचे माजी नगरसेवक तुषार कामठे यांनी शहराध्यक्षपदाची धुरा स्विकारली आणि अजित पवार गटाला आव्हान दिले. लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने आपली ताकद दाखवण्याची संधी असतानाही राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांनी सावध भूमिका घेतल्यामुळे राष्ट्रवादीचा प्रभाव या निवडणुकीत दिसला नाही. त्यामुळे शहराच्या राजकारणात बलाढ्य राहिलेली राष्ट्रवादी आता नाममात्र उरते की काय? अशी स्थिती निर्माण झाली आहे.

### आमदार महेश लांडगेंसमोर राष्ट्रवादी 'सरेंडर'

मावळमध्ये महाविकास आघाडी किंवा महायुतीच्या उमेदवाराकडे कोणत्याही राष्ट्रवादीचे चिन्ह नव्हते. पण, शिरुर लोकसभा मतदार संघात राष्ट्रवादी शरद पवार गट विरुद्ध राष्ट्रवादी अजित पवार गट अशी लढाई होती. ही लढाई दोन्ही पक्षांच्या सर्वोच्च नेत्यांकडून प्रतिष्ठेची करण्यात आली. पण, भोसरी विधानसभा मतदार संघात राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांनी भाजपाचे विद्यमान आमदार महेश लांडगे यांच्यासमोर 'सरेंडर' केले, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे. गेल्या दोन महिन्यांच्या काळात पक्षाच्या चिन्हावर उमेदवार रिंगणात असताना राष्ट्रवादीच्या सर्वोच्च नेत्यांची एकही सभा या मतदार संघात झाली नाही. दोन्ही गटांकडून वर्चस्वाची लढाई किंवा प्रचारातील चढाओढ दिसली नाही. किंबहुना, भाजपा आणि महेश लांडगे यांच्या समोर दोन्ही राष्ट्रवादी निष्प्रभ ठरलेल्या आहेत. राष्ट्रवादीचे स्थानिक नेते माजी आमदार विलास लांडे, शहराध्यक्ष अजित गव्हाणे, शहराध्यक्ष तुषार कामठे यांच्यासह स्थानिक पातळीवर दोन्ही पक्षाच्या नेत्यांना ऑन फिल्ड किंवा सोशल मीडियावरसुद्धा उमेदवार कोल्हे किंवा आढळराव पाटील यांच्यासाठी प्रभावीपणे 'परफार्मन्स' देता आला नाही.

### ना सभा... ना लक्षवेधी प्रचार... केवळ सोपस्कार...!

» मावळातून महाविकास आघाडीचे संजोग वाघेरे यांच्या प्रचारात शरद पवार गटाचे शहराध्यक्ष तुषार कामठे यांनी सक्रीय सहभाग दाखवण्याचा प्रयत्न केला. मात्र, बूथयंत्रणा आणि निवडणूक व्यवस्थापनामध्ये सहभाग दिसला नाही. तसेच, महायुतीचे श्रीरंग बारणे यांच्या प्रचारात अजित पवार गटाचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे दोनदा सोशल मीडियावर झळकले. मात्र, प्रत्यक्ष प्रचारात त्यांचा सहभाग नगण्य होता. शिरुर लोकसभा मतदार संघातून महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या प्रचारासाठी भोसरीत राष्ट्रवादीच्या दोन्ही गटाकडून ना सभा झाली ना लक्षवेधी प्रचार झाला. महायुती आणि महाविकास आघाडीत तोडीस-तोड ताकद असतानाही राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांचा 'परफॉर्मन्स' सुमार राहिला. पिंपरी, चिंचवड आणि भोसरी अशा तीनही मतदार संघामध्ये अजित पवार यांची एक सभा वगळता राष्ट्रवादीला प्रभाव दाखवता आला नाही, ही वस्तुस्थिती आहे.

# लंडनवरुन येऊन तरुण मतदाराने बजावला मतदानाचा हक्क

## सर्वांनी घरातून बाहेर पडावे आणि मतदान करावे : अभिनेत्री सोनाली कुलकर्णींचं मतदारांना आवाहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

जिल्ह्यात आज मावळ, पुणे आणि शिरूर लोकसभा मतदारसंघातील निवडणुकीचे मतदान झाले. विविध मतदान केंद्रावर परदेशातून खास मतदान करण्यासाठी आलेले मतदारदेखील पहावयास मिळत होते. डॉ. किरण तुळसे यांनी लंडनवरून येवून आपला मतदानाचा हक्क बजावून स्थानिक नागरिकांसमोर मतदानाचा हक्क बजावण्याचे एक आदर्श उदाहरण दिले.

पिंपरी चिंचवड मधील डॉ. किरण यांनी सोमवारी दुपारी आपल्या आई वडिलांसह थेरगाव येथील एम. एम.



हायस्कूलमध्ये मतदान करून आपले राष्ट्रीय कर्तव्य बजावले. डॉ. किरण तुळसे हे मागील सहा वर्षांपासून लंडन येथे स्थायिक आहेत.

आई, वडिलांचा सामाजिक कार्याचा आदर्श डोळ्यापुढे ठेवत नोकरी करून कौटुंबिक जबाबदारी पार पाडत असताना मतदान करणे ही देखील आपली राष्ट्रीय जबाबदारी आहे, हा विचार त्यांना मनात सतत येत होता. प्रत्येकाच्या एकेका मताने लोकशाही बळकट होत असते. त्यामुळे मी आवर्जून लंडन येथून फक्त या लोकसभा निवडणुकीच्या मतदानासाठी आलो आहे, असे डॉ. तुळसे यांनी सांगितले.

# कसबा अन् कोथरुड ठरवणार पुण्याचा खासदार

## मुरलीधर मोहोळ, रवींद्र धंगेकर आणि वसंत मोरे या तिन्ही उमेदवारांचं भवितव्य मतपेटीत बंद



**पुणे | प्रतिनिधी**

पुणे लोकसभा निवडणुकीसाठी मतदार पार पडलं. मुरलीधर मोहोळ, रवींद्र धंगेकर आणि वसंत मोरे या तिन्ही उमेदवारांचं भवितव्य मतपेटीत बंद झालं आहे. त्यात पुण्यात संध्याकाळी सहावाजेपर्यंत 50.50 टक्के मतदान पार पडलं. 50.50 टक्के जरी मतदान पार पडलं असलं तरीदेखील पुण्यात कोणत्या मतदारसंघात कोणत्या विधानसभा मतदार संघात किती टक्के मतदान झालं. यावर पुण्याचा खासदार कोण होणार?, हे अवलंबून आहे. त्यात कसबा आणि कोथरुड विधानसभा मतदारसंघातील मतदानाची टक्केवारी गेम चेंन्जर ठरण्याची शक्यता आहे. कसबा आणि कोथरुड दोन्ही विधानसभा मतदारसंघ भाजपचा बालेकिल्ला मानला जातो मात्र विधानसभा पोटनिवडणुकीत रवींद्र धंगेकरांनी दाखवलेल्या करिश्म्यामुळे यंदा कसबा मतदार संघातील मतदान महत्वाचं ठरणार आहे.

पुणे लोकसभा मतदास संघात कोथरूड, पर्वती, शिवाजीनगर, पुणे कॅन्टोन्मेंट आणि वडगाव शेरी हे विधानसभा मतदारसंघ आहेत. त्यात सहाही विधानसभा मतदार संघात भाजपची बऱ्यापैकी पकड आहे. यात कसबा आणि कोथरुडमधील या दोन्ही विधानसभा मतदार संघाची सध्याची आकडेवारी बघितली तर कोथरुडपेक्षा कसब्यात झालेल्या मतांची टक्केवारी जास्त आहे. कसब्यात सरासरी 57.90 टक्के मतदान पार पडलं आहे तर कोथरुडमध्ये 49.10 टक्के सरासरी मतदानाची नोंद झाली आहे. मात्र या मतदानाची अंतिम आकडेवारी अजून जाहीर व्हायची आहे. अंतिम आकडेवारी वाढण्याची शक्यता आहे. त्या अंतिम आकडेवारीत नेमकं कोणत्या मतदारसंघात कोणत्या मतदार संघाची आकडेवारी वाढते, यावर दोन्ही उमेदवारांचं भवितव्य अवलंबून असणार आहे.

पुण्यात सकाळच्या सुमारास मतदानासाठी नागरिकांनी गर्दी केली होती. प्रत्येक विधानसभा मतदारसंघात गर्दी पाहायला मिळाली. दुपारच्या सुमारासदेखील गर्दी ओसरली नव्हती. मात्र त्यानंतर काही प्रमाणात मतदानाची टक्केवारी घसरली. 3 वाजेपर्यंत पुणे लोकसभा मतदारसंघात 33.7 टक्के मतदानाची नोंद झाली होती. यात कोथरुड विधानसभा मतदार संघात 37.2, वडगावशेरी विधानसभा मतदार संघात 26.61 टक्के, कोथरुड विधानसभा मतदार संघात 37.2 टक्के, पर्वती विधानसभा मतदार संघात 27.14 टक्के तर कसबा विधानसभा मतदार संघात 35.23 टक्के मतदानाची नोंद झाली होती. त्यासोबतच मावळ 36.54 टक्के मतदानाची नोंद झाली होती आणि शिरुर लोकसभा मतदारसंघात 36.43 टक्के मतदानाची नोंद झाली होती. त्यानंतर पाच वाजेपर्यंत कसबा पेठ - 51.07%, कोथरूड - 48.91%, पर्वती - 46.80%, पुणे कॅन्टोन्मेंट - 44.01%, शिवाजीनगर - 38.73%, वडगाव शेरी - 40.50% मतदानाची नोंद झाली होती.

### कसबा कोणाचा, कोथरुड कोणाचं

» पुण्यात कोथरुड आणि कसबा मतदार संघ भाजपचा बालेकिल्ला मानता जातो. त्यात सहा विधानसभा मतदारसंघात पाहिलं कसबा सोडला तर बाकी पाच मतदारसंघात महायुतीचे आमदार आहेत. कसबा देखील भाजपचा बालेकिल्ला मानला जायचा मात्र कसब्याचे खासदार गिरीश बापट यांच्या निधनानंतर झालेल्या पोटनिवडणुकीत कॉंग्रेसने भाजपच्या बालेकिल्ल्याला सुरुंग लावला आणि रवींद्र धंगेकर इथून विजय खेचून आणला. त्यामुळे भाजपला बालेकिल्ला असला तरीही इथे धंगेकरांना मानणारादेखील मोठा वर्ग आहे. त्यामुळे आता कसब्यातील मतदान गेमचेंन्जर ठरु शकतो. वाढीव मतदान नेमकं कुणाचं भवितव्य ठरवतं हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

# मतदार यादीतून हजारो नावे वगळली

## पुणे लोकसभा मतदारसंघातील मतदार याद्यांचा घोळ मिटविण्यात पुण्याचे निवडणूक निर्णय अधिकारी अपयशी

**पुणे | प्रतिनिधी**

मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी प्रशासन प्रयत्न करत असताना मतदार यादीतील घोळ मिटविण्यात पुण्याचे निवडणूक निर्णय अधिकारी अपयशी ठरल्याचे सोमवारी (दि. १३) पुण्यातील मतदानादरम्यान दिसून आले. शहरातील हजारो नागरिकांची नावे मतदार यादीतून वगळली गेल्याचे धक्कादायक प्रकार मतदानादरम्यान उघडकीस आला.

वर्षानुवर्षे मतदान करणाऱ्या अनेकांना यावेळी लोकसभा निवडणुकीत मतदानाचा अधिकार बजावता आला नाही. मतदान केंद्रावर जाऊनही मतदान करू न शकल्याने अनेक नागरिकांना धक्का बसला. शहरातील बहुतांश बूथवर सोमवारी हेच चित्र होते. त्यामुळे मतदान केंद्रावरील स्वयंसेवक वैतागून गेले होते. मोठ्या प्रमाणावर नावे गहाळ असल्याचे त्यांनी सांगितले. विशेष म्हणजे, ज्यांनी याच केंद्रावर अनेक वर्षांपासून मतदान केले होते त्यांचीही नावे यादीत नव्हती.

### सिंगापूरहून येऊनही यादीत नाव नसल्याने निराशा

मतदानाचा पवित्र हक्क बजावण्यासाठी सिंगापूर येथून आलेले श्रीयश कुलकर्णी यांचे नावही मतदार यादीतून वगळण्यात आले आहे. ते म्हणाले, “मी मतदानासाठी सिंगापूरहून पुण्यात आलो होतो. मात्र, मतदार यादीतून माझे नाव गायब असल्याचे मला आढळून आले. नाव मतदार यादीत समाविष्ट व्हावे, यासाठी माझ्या वडिलांनी निवडणूक अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, पण ते शक्य झाले नाही. मी बूथवर आलो. मतदार नोंदणीसाठी फॉर्म ६ भरण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत मतदान करू शकेल. मात्र, लोकसभेचे मतदान मात्र बुडाले. सिंगापूरहून पुण्याला येण्यासाठी केलेला २५ हजार रुपयांचा खर्च वाया गेला.”



### तुमच्यासारखे वृद्ध मृत झालेले असावे...

मीरा सोसायटीतील ज्येष्ठ नागरिक राजेश्वरी रावत सकाळीच मतदानासाठी गेल्या. त्यांचे नाव मतदार यादीत होते. मात्र, त्यांच्या पतीचे नाव नव्हते. त्यांनी आजपर्यंत कधीही मतदान चुकविलेले नाही. तरीही त्यांचे नाव मतदार यादीत कसे नाही, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. महर्षीनगरचे आदिल गोदरेज बरूचा हे ८० वर्षांचे ज्येष्ठ नागरिक आहेत. ते म्हणाले, “मी वयाच्या २१ व्या वर्षापासून प्रत्येक निवडणुकीत मतदान केले आहे. मात्र, मतदार ओळखपत्र असूनही माझे नाव मतदार यादीत नव्हते. माझ्यासोबतच अनेक ज्येष्ठ नागरिकांची नावे मतदार यादीतून वगळली गेली आहेत. संतापजनक म्हणजे तुमच्यासारखे वृद्ध मृत झाले असावे, असा संतापजनक विनोद निवडणूक केंद्रावरील एका कर्मचाऱ्याने केला.”

### ‘निर्भय बनो’चे विश्वंभर चौधरी यांचे नाव गायब

» भारतीय जनता पक्षाविरुद्ध ‘निर्भय बनो’ हे आंदोलन चालविणारे सामाजिक कार्यकर्ते विश्वभंर चौधरी यांचे नावही मतदार यादीतून गायब झाले. रविवारी (दि. १२) त्यांनी यासंदर्भात निवडणूक अधिकाऱ्यांशी संपर्क साधला होता. त्यावेळी त्यांना आपले नाव मतदार यादीत नसल्याचे समजले होते. पत्ता बदलल्याने नाव वगळले गेल्याचे त्यांना सांगण्यात आले.

# आता रेशनसाठी डोळ्यांचे स्कॅनिंग

## पिंपरी चिंचवड शहरात स्वस्त धान्य दुकानात 'आय स्कॅनर' , शस्त्रक्रिया झालेल्यांचे डोळे होईनात स्कॅन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरात आता डोळे स्कॅन करून रेशन मिळणार असून या सुविधेसाठी पिंपरी-चिंचवड शहरातील १५७ स्वस्त धान्य दुकानदारांना अद्ययावत केलेल्या मशिनचे वाटप करण्यात आले आहे. त्यामुळे आता बोटांच्या ठशांऐवजी डोळ्यांचे स्कॅनिंग करून शिधापत्रिकाधारकांना धान्य मिळणे सुलभ होणार आहे.

मात्र, त्यातही त्रुटी आढळून येत असून ज्यांच्या बोटांचे ठसे उमटत नाहीत, अशा अनेक ज्येष्ठांच्या डोळ्यांची विविध कारणांनी शस्त्रक्रिया झाल्याने त्यांचे डोळेही स्कॅन होईनात. त्यामुळे या यंत्रनेतही अडचणी येत असून पुन्हा शिधापत्रिकाधारकांना धान्यापासून वंचित राहावे लागणार का? असा प्रश्न आहे.

शहरातील सर्वच रास्तभाव दुकानात ई-पॉस यंत्र आहे. मात्र, काही जणांच्या बोटांवरील रेषा पुसट होतात. धान्य मिळण्यापूर्वी बोटांचे ठसे उमटले जात नसल्याने शिधापत्रिकाधारकांना धान्यापासून वंचित राहावे लागत होते. त्यांना आता स्कॅनरची (डोळ्यांचे स्कॅन) देखील सुविधा दिली आहे.

या सुविधेसाठी पिंपरी-चिंचवड शहरातील १५७ स्वस्त धान्य दुकानदारांना अद्ययावत केलेल्या मशिनचे वाटप करण्यात आले आहे. मात्र, त्या मशिनमध्येही काही त्रुटी येत आहेत. ज्येष्ठ नागरिक किंवा काही कष्टाची कामे करणाऱ्यांच्या बोटांचे ठसे पुसट होतात. यांच्यासाठी हे मशिन आहे..

मात्र, ज्यांचे डोळे चांगले आहेत, त्यांच्यासाठीच या मशिनचा वापर करता येत आहे. काही कारणांनी ज्यांच्या डोळ्यांची शस्त्रक्रिया झाली आहे, अशांसाठी हे मशीन उपयुक्त नाही. कारण त्यांच्या डोळ्यांचे स्कॅन होत नाही. त्यामुळे त्रुटी दूर करूनच यंत्रणा राबविणे गरजेचे आहे.

धान्य वाटपात पारदर्शीपणा यावा यासाठी ई-पॉस मशिनची सुविधा देण्यात आली आहे. या मशिनद्वारे कुटुंबातील सदस्यांची माहिती मिळते व त्यानुसार धान्य वाटप केले जात होते. त्यासाठी अंगठ्याचे ठसे घेतले जात होते. मात्र, अनेक वेळा अंगठ्यांचे ठसेच न उमटल्याने धान्य मिळत नाही. त्यावर उपाय म्हणून आय स्कॅनरची सुविधा दिली आहे.



> ई-पॉस मशिनमध्ये अनेक सुविधा देण्यात येणार आहेत. ठसे न उमटलेल्यांना धान्य न मिळाल्याने तक्रारी येत होत्या. त्यावर उपाय म्हणून आय स्कॅनरची सुविधा व मशिन १ मे पासून दिली आहे. मात्र, अनेक ज्येष्ठांच्या डोळ्याची शस्त्रक्रिया झाली आहे. त्यामुळे त्यांचे डोळे स्कॅन होत नाही. त्यामुळे या योजनेतही त्रुटी येत आहेत. परिणामी ज्यांच्यासाठी ही योजना आहे, ते पुन्हा धान्यापासून वंचित रहाणार आहेत. त्यामुळे योजना राबविताना सरकारने सर्व गोष्टींचा विचार करून राबविणे गरेजेच आहे
>
> \- विजय गुप्ता, खजिनदार, ऑल महाराष्ट्र फेरप्राईज शॉपकिपर्स असोसिएशन.

### ठसे उमटेनात, डोळे स्कॅन होईनात

» ज्या व्यक्तींचे वय ६० पेक्षा अधिक आहे, अशांच्या हाताचे अनेकदा ठसे उमटत नाहीत. तसेच कष्टाचे काम करणाऱ्यांच्या बोटाचेही ठसे उमटत नाहीत. त्यामुळे आय स्कॅन ही सुविधा उपयुक्त आहे. मात्र, काही कारणांनी ज्यांच्या डोळ्यांची शस्त्रक्रिया झाली आहे, त्यांच्या डोळ्यांचे स्कॅन होत नाही. परिणामी त्यांना पुन्हा धान्यापासून वंचित रहावे लागत आहे. त्यामुळे त्रुटी दूर करूनच उपाययोजना राबविण्याची गरज आहे, असे शिधापत्रिका धारकांचे म्हणणे आहे.

# यात्रा, निवडणूक होताच फूल बाजार कोमजला

## पाणीटंचाईमुळे पिकांना पाणी मिळणे मुश्किल झाले त्यामुळे उत्पादनावर परिणाम

**पिंपरी | प्रतिनिधी**

संपूर्ण महाराष्ट्रात यंदा पाणीटंचाईचा प्रश्न निर्माण झाला आहे. पाणीटंचाईमुळे पिकांना पाणी मिळणे मुश्किल झाले आहे. त्यामुळे त्याचा फुलाच्या उत्पादनावर परिणाम होत आहे; मात्र तरीही यंदा निवडणूक व लग्नसराईमुळे फुलांना मोठी मागणी होती.

कार्यालयांचे उद्घाटन, नेत्यांचे स्वागत, सभा, आणि नेत्यांच्या स्वागतासाठी फुलांची मागणी वाढली होती. या वाढत्या मागणीमुळे फुलांच्या दरातदेखील वाढ झाली होती. मात्र आता निवडणुका संपताच आणि यात्रांचा हंगाम कमी होताच फूल बाजार कोमजला आहे. फुलांना योग्य भाव मिळत नसल्याने फूल उत्पादक हवालदिल झाले आहेत.

प्रत्येक कार्यक्रमाला जाताना बुके किंवा फुलांचा हार घेऊन जाण्याची प्रथा काही नवीन नाही. त्यामुळे दररोज हजारो किलो फुलांची गरज भासते. मावळ तालुका हा फूल उत्पादक म्हणून ओळखला जातो. तालुक्यातून व्हॅलेंटाइन डेला परदेशात फुलांची निर्यात होते. मात्र यंदा मावळमध्ये अपेक्षित पाऊस न झाल्याने तालुक्यात काही ठिकाणी दुष्काळसदृश्य स्थिती असल्याने फुलांचे उत्पादनी कमी झाल्याचे शेतकरी सांगत आहेत.

परिणामी, फुलांच्या दरात वाढ झाली होती. निवडणुकीपूर्वी गुलाब १०० ते १५० रुपये किलो होता. निवडणूक काळात तो २०० रुपये किलो झाला होता. निवडणुकीपूर्वी सव्वादोनशे ते अडीचशे रुपये किलो भाव असलेला निशिगंध २५० ते ३०० रुपये किलोवर गेला होता. निवडणूक व यात्रांच्या काळात फुलांचे दर वाढल्याने बुके आणि हारांचे दरही वाढले होते.

निवडणूक काळात बाजारात फुलांची आवक कमी झाल्याने हार, बुके खरेदी करताना पुढारी व कार्यकर्त्यांच्या खिशाला मोठी कात्री लागत होती. तसेच मोठमोठ्या हारांसाठी झेंडूच्या फुलांची मागणी मोठ्या प्रमाणावर असल्याने त्यावेळी झेंडूचेही दर वाढले होते.

राज्यात प्रचाराचा जोर जसा वाढत होता तसा फुलांचा दरही वाढत होता. प्रचारासाठी नेत्यांचे दौरे, रॅली आणि लहान-मोठ्या सभांचे आयोजन करण्यात येत होते. तसेच विविध पक्षांची कार्यालये, शाखा, चौक सभा मोठ्या प्रमाणात वाढल्या होत्या.



### यामुळे वाढले होते फुलांचे दर

» उन्हाळ्याचे दिवस असल्याने निशिगंध, जरबेरा, डच गुलाब ही फुले लवकर सुकतात. त्यामुळे ग्राहकांना ताज्या फुलांचे हार देण्यासाठी दररोज फुलांची गरज पडते. मात्र, बाजारात फुलांची आवक जेमतेम होती. तयामुळे फुलांचे दर वाढले होते. त्यामुळे हार आणि बुके यांचे दरही काही प्रमाणात वाढले होते. मात्र निवडणूक होताच पुन्हा फुलांचे भाव गडगडले आहेत.

# तरुण पिढी नारळ पाणी पिण्यासाठी जाते का?

## वसंत मोरेंचा रोखठोक सवाल, हिट अँड रन प्रकरणावरुन राजकारण रंगलं

**पुणे | प्रतिनिधी**

हिट अँड रन प्रकरणावरुन राजकारण रंगलं आहे. पुण्यातील विविध पक्षीय नेते परस्परांवर आरोप-प्रत्यारोप करत आहेत. "कोणकोणत्या नेत्याचे कुठे कुठे नाईट लाईफमध्ये लागेबांधे आहेत, भविष्यात जर त्यांच्यावर कारवाई झाली नाही, तर जागेवर जाऊन लाईव्ह केले जातील" असा इशारा वसंत मोरे यांनी दिला.

कोरेगाव पार्कमधील कल्याणी नगर येथे हिट अँड रनची जी घटना घडली, त्यावरुन आता पुण्यात राजकारण रंगलं आहे. पुण्यातील नेते परस्परांवर आरोप-प्रत्यारोप करत आहेत. याची सुरुवात काँग्रेस नेते रवींद्र धंगेकर यांनी केली. "पुणेकरांच समाधान करण्याकरता देवेंद्र फडणवीस आले होते. या प्रकरणात तपास अधिकाऱ्याने चुकीच्या पद्धतीने तपास केला, त्याच्यावर आतापर्यंत कुठलीही कारवाई केली नाही हे फक्त दाखवण्यापुरता देखावा होता" असा आरोप रवींद्र धंगेकर यांनी केला आहे. त्याला भाजपा नेते मुरलीधर मोहोळ यांनी उत्तर दिलं.



### 'जबाबदार ही भ्रष्ट यंत्रणा असेल'

» "कोणकोणत्या नेत्याचे कुठे कुठे नाईट लाईफमध्ये लागेबांधे आहेत, भविष्यात जर त्यांच्यावर कारवाई झाली नाही, तर जागेवर जाऊन लाईव्ह केले जातील. पोलीस यंत्रणेने फक्त कोरेगाव पार्क टार्गेट न करता संपूर्ण पुणे शहर सुद्धा टार्गेट करावे. अन्यथा वंचित बहुजन आघाडी म्हणून जर कुठे हिंसक आंदोलन झाली तर त्याला संपूर्णपणे जबाबदार ही भ्रष्ट यंत्रणा असेल" असा इशारा वसंत मोरे यांनी दिला आहे

"लोक तुम्हाला का नाकारतात? कारण, तुमचा अभ्यास कच्चा असतो. खोटे नॅरेटिव्ह सेट करण्यासाठी तुम्ही काहीही करु शकता. आताच्या निवडणुकीतही पुणेकरांनी ते पाहिलं आणि आता या संवेदनशील प्रकरणातही तेच" अशी टीका मुरलीधर मोहोळ यांनी केली.

### 'तरुण पिढी नारळाचे पाणी पिण्यासाठी जाते का?'

» "सोबतच भुगाव, पिरंगुट या भागाकडे म्हणजेच मुळशीकडेही लक्ष द्यावे. तसेच ज्यांनी निवेदन दिली त्यांनी सुद्धा एन आय बी एम कोंढवा भागाकडे सुद्धा लक्ष द्यावे. नाहीतर असं म्हणावं लागेल कोरेगाव पार्कमध्ये जाणारी तरुण पिढी दारू पिण्यासाठी जाते आणि वरील भागांमध्ये नाईट लाईफ साठी जाणारी तरुण पिढी नारळाचे पाणी पिण्यासाठी जाते का?" असं वसंत मोरे म्हणाले.

आता यामध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेना सोडून वंचित बहुजन आघाडीमध्ये आलेल्या वसंत मोरे यांनी मत नोंदवलं आहे. "कोरेगाव पार्क मध्ये जो अपघात झाला, तो दुर्दैवीच होता. पण त्यामागून जे राजकारण चालू दिसतंय त्यामध्ये आपल्या पुण्याच्या काही नेत्यांची कीव येते" असं वसंत मोरे यांनी म्हटलं आहे. "नाईट लाईफ काय फक्त कोरेगाव पार्क मध्येच आहे का? ज्यांनी पुढाकार घेऊन कारवाया लावल्या, त्या कोथरूडमधील पुढाऱ्यांनी जरा आपल्या भागातील नाईट लाईफ विषयी लक्ष द्यावे" असं वसंत मोरे यांनी म्हटलं आहे.

पोलिसांनी आरोपी वेदांत अग्रवाल याचे वडील विशाल अग्रवाल यांच्यासह तिघांना 24 मे पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणी सत्र न्यायालायत सुनावणी पार पडली. यावेळी पुणे पोलिसांकडून युक्तिवाद करण्यात आला. सरकारी वकिलांनी विशाल अग्रवाल यांच्यासह तीन आरोपींची 7 दिवसांची पोलीस कोठडी देण्यात यावी, अशी मागणी केली होती. कोर्टाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर विशाल अग्रवालसह तिघांना 24 तारखेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. विशाल अग्रवाल यांच्यसह बार चालक जितेश शेवनी आणि जयेश बोनकर या दोघांना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

# मध्यरात्रीनंतर नाकाबंदी, मद्यपी वाहनचालकांवर कारवाई

## अपघात प्रकरणानंतर वाहतूक पोलिसांनी मद्यपी वाहनचालकांविरुद्ध कारवाईचा बडगा

**पुणे | प्रतिनिधी**

कल्याणीनगर अपघात प्रकरणानंतर वाहतूक पोलिसांनी मद्यपी वाहनचालकांविरुद्ध कारवाईचा बडगा उगारला आहे. वाहतूक पोलिसांनी मुंढवा, कोरेगाव पार्क, येरवाडा, विमाननगरसह शहरातील वेगवेगळ्या भागात नाकाबंदी करून ८५ मद्यपी वाहनचालकांविरुद्ध कारवाई केली. मध्यरात्रीनंतर शहरात होणारे अपघात, तसेच मद्यपी वाहन चालकांविरुद्ध कारवाई करण्यासाठी आता अचानक नाकाबंदी करण्यात येणार आहे.



कल्याणीनगर भागात रविवारी मध्यरात्री भरधाव मोटारीने दुचाकीस्वार संगणक अभियंता तरुणासह त्याच्या मैत्रीणीला धडक दिली. अपघातात दोघांचा मृत्यू झाला. अल्पवयीन मोटारचालक मुलगा मित्रांसोबत पार्टी करून कल्याणीनगर भागातून निघाला होता. कल्याणीनगर अपघात प्रकरणानंतर वाहतूक पोलिसांनी मध्यरात्री वाहतुकीचे नियम धुडकावून भरधाव वेगाने वाहन चालविणारे, तसेच मद्यपी वाहनचालकांविरुद्ध कारवाई सुरू केली आहे. वाहतूक पोलीस, तसेच स्थानिक पोलीस ठाण्यातील कर्मचाऱ्यांनी मध्यरात्री बारानंतर पहाटेपर्यंत शहरातील वेगवेगळ्या भागात नाकाबंदी केली.

बुधवारी पहाटेपर्यंत वेगवेगळ्या भागात कारवाई करून १२५५ वाहनचालकांची तपासणी केली. या कारवाईत ८५ वाहनचालकांनी मद्यप्राशन केल्याचे उघडकीस आले. त्यांच्याविरुद्ध खटले दाखल करण्यात आले असून,

### कल्याणीनगर घटनेनंतर पोलिसांना जाग

» कल्याणीनगर 'हिट अँड रन' घटनेनंतर पुणे पोलिसांना जाग आली आहे. त्यांनी ड्रंक अँड ड्राइव्हची कारवाई सुरू केली आहे. घटना घडलेल्या येरवडा पोलीस स्टेशनसह अधिक पब विमानतळ, कोरेगाव पार्कसह चतु:श्रृंगी पोलीस स्टेशनच्या हद्दीत प्रत्येकी दोन ठिकाणी, तर उर्वरित पोलीस स्टेशनच्या हद्दीत एक ठिकाणी अशी शहरात ३७ ठिकाणी नाकाबंदी करण्यात आली आहे. १ हजार २५५ वाहनांची तपासणी करून ८५ ड्रंक अँड ड्राइव्हच्या कारवाई करण्यात आल्या.

वाहतूक नियमांचा भंग करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून दोन लाख २२ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. येरवडा, विमाननगर, चतु:श्रृंगी, मुंढवा, कोरेगाव पार्कसह वेगवेगळ्या भागात ही कारवाई करण्यात आली. मुंढवा आणि सहकारनगर भागात वाहतूक पोलिसांनी सर्वाधिक कारवाई केली. पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सहपोलीस आयुक्त प्रवीण पवार यांच्या मार्गदर्शनाखाली यापुढील काळात अचानक नाकाबंदी करून वाहनचालकांची तपासणी करण्यात येणार आहे, अशी माहिती वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त रोहिदास पवार यांनी दिली.

पोलीस आयुक्त अमितेश कुमार, वाहतूक उपायुक्त रोहिदास पवार यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक आणि स्थानिक पोलिसांनी मिळून ही कारवाई केली.